# म. गांधींवरील चित्रप्रदर्शनास प्रारंभ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'मोहनदास ते महात्मा' या विषयावरील छायाचित्र प्रदर्शनामुळे इतिहासापासून वर्तमान उज्ज्वल करण्याची प्रेरणा आजच्या तरुणांना मिळेल', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यासन केंद्राच्यावतीने येथील दसरा चौकातील शाहू स्मारक भवनाच्या प्रदर्शनगृहात महात्मा गांधी यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य काळातील दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'या प्रदर्शनाच्या माध्यमातून मोहनदास करमचंद गांधी या बॅरिस्टर व्यक्तीचा महात्मा होण्यापर्यंतचा प्रवास कसा झाला, याची माहिती मिळते. आपल्याला माहिती असलेल्या गांधीजींपेक्षा एक वेगळे गांधी या प्रदर्शनातून आपल्याला दिसतात. हेच या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे.'



गांधी जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अध्यासन केंद्रातर्फे मोहनदास ते महात्मा या छायाचित्र प्रदर्शनाची पाहणी करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत केंद्र समन्वयक डॉ. भारती पाटील, प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

यावेळी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. किशोर बेडकीहाळ, अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील, डॉ. पी.डी. राऊत, डॉ. भारती पाटील, अधिसभा सदस्य संजय जाधव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे प्रदर्शन ६ ऑक्टोबरपर्यंत सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू राहणार असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठातर्फे 'स्वच्छता ही सेवा' अभियान

## कुलगुरूंसह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात 'स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत विद्यापीठ परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अभियानास शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवकांसह विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे व वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी सकाळी विद्यापीठ परिसर स्वच्छता करण्यात आली. कुलगुरूंसह अन्य अधिकाऱ्यांनी पर्यावरणपूरक मोटारीतून परिसरातील प्रत्येक अधिविभागाला भेट देऊन त्या-त्या ठिकाणी चाललेल्या स्वच्छता मोहिमेची पाहणी करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.



**कोल्हापूर : स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षक व कर्मचारी. (छाया : पप्पू आत्तार)**

अभियानानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. गांधी अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. भारती पाटील यांनी उपस्थिताना अहिंसा, शांततेची शपथ दिली. संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे विशेष भजन कार्यक्रम झाला. स्वच्छता सेवा उपक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, अजित चौगुले, डॉ. डी. के. गायकवाड, देवस्थान समितीचे विजय पवार, पुजारी समितीचे सल्लागार गणेश विश्वनाथ नेर्लेकर-देसाई, रेल्वेचे स्टेशन प्रबंधक ए. आय. फर्नांडिस, शिवनाथ बियाणी यांनी सक्रिय सहभाग घेतला..

**विद्यापीठातर्फे शहरात सलग दोन दिवस स्वच्छता मोहीम**

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत गेले दोन दिवस शहरातील महत्त्वाचे ठिकाण असलेले श्री अंबाबाई मंदिर परिसर, मध्यवर्ती बस स्थानक, छत्रपती शाहू महाराज रेल्वे टर्मिनस परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. भवानी मंडप परिसरात विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी जागृतीपर पथनाट्य सादर केले.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित स्वच्छता मोहिमेत सहभागी विद्यार्थिनी.

# शिवाजी विद्यापीठ परिसराची स्वच्छता

**कोल्हापूर, ता. २ :** शिवाजी विद्यापीठात दरवर्षीप्रमाणे यंदाही 'स्वच्छताच सेवा' अभियानांतर्गत विद्यापीठ परिसरात स्वच्छता मोहीम झाली. शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थ्यांचा त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज स्वच्छता अभियानास सुरवात झाली. रस्त्याकडेला वाढलेली काटेरी झुडपे, गवत, परिसरात पडलेला कचरा साफ करण्यात आला.

मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रशासकीय सेवकांनी त्यांना नेमून दिलेल्या एनसीसी भवन गेटपर्यंतच्या परिसरात अधिविभागांनी आपापल्या परिसराची स्वच्छता केली.

अभियानानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. गांधी अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. भारती पाटील यांनी अहिंसा, शांततेची शपथ दिली. त्यानंतर संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे विशेष भजन कार्यक्रम सादर करण्यात आला. दरम्यान, विद्यापीठातर्फे शहरात सलग दोन दिवस अंबाबाई मंदिर, मध्यवर्ती बस स्थानक व छत्रपती शाहू महाराज रेल्वे टर्मिनस परिसरात स्वच्छता मोहीम झाली.

Kolhapur, Kolhapur-Today
03/10/2018 Page No. 3

# विद्यापीठाचे 'स्वच्छता ही सेवा' अभियान उत्साहात

## शहरात विविध ठिकाणी स्वच्छता

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात यंदाही 'स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत विद्यापीठ परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या अभियानाला शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थ्यांचा उत्साही प्रतिसाद लाभला.

मंगळवारी सकाळी साडेसात ते दहा या कालावधीत हे अभियान राबविण्यात आले. रस्त्याकडेला वाढलेली काटेरी झुडपे, गवत, परिसरात पडलेला कचरा साफ करण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी हातात खराटे, खुरपे घेऊन स्वच्छतेला सुरुवात केली. मुख्य इमारतीमधील प्रशासकीय सेवकांनी त्यांना नेमून दिलेल्या एनसीसी भवन गेटपयतच्या परिसरामध्ये, तर अधिविभागांनी आपापल्या परिसराची स्वच्छता केली.

मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. गांधी अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. भारती पाटील यांनी अहिंसा, शांततेची शपथ दिली. संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे भजन झाले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी प्रशासकीय कर्मचाऱ्यांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व अन्य मान्यवर.**

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत गेले दोन दिवस कोल्हापूर शहरात विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये रविवारी करवीर निवासिनी अंबाबाई मंदिर परिसरात तसेच सोमवारी मध्यवर्ती बस स्थानक आणि छत्रपती शाहू महाराज रेल्वे टर्मिनस परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. श्री अंबाबाई मंदिर परिसरातील मातृलिंग देवस्थान, मंदिराचे छत, घाटी दरवाजा, राजमंदिर परिसर, नगारखाना, जुना राजवाडा, जोतिबा रोड, महाद्वार रोड, संत गाडगे महाराज पुतळा आदी ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, विद्यापीठातील अधिकारी, प्रशासकीय सेवक, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या बरोबरीने देवस्थान समितीचे विजय पवार, पुजारी समितीचे सल्लागार गणेश विश्वनाथ नेर्लेकर-देसाई, किशोर जाधव, धनाजी जाधव, हेमंत पोतनीस यांनी सक्रिय सहभाग घेतला. भवानी मंडप परिसरात विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी जागृतीपर पथनाट्य सादर केले.

सोमवारी सकाळी छत्रपती शाहू महाराज टर्मिनस रेल्वे स्थानक परिसर स्वच्छता अभियानात स्थानकासमोरील संपूर्ण परिसर, मारुती मंदिर परिसर, पोस्ट ऑफिस, मोटार स्टँड, रेल्वे स्टेशन बाग, रेल्वे स्टाफ क्वॉर्टर परिसराची स्वच्छता करण्यात आली. मध्यवर्ती बस स्थानक परिसरामधून प्लास्टिक पिशव्या, कागद, रॅपर्स, पाण्याच्या प्लास्टिक बाटल्या तसेच अन्य कचरा गोळा करून स्वच्छता करण्यात आली. विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कोल्हापूर रेल्वेचे स्टेशन प्रबंधक ए.आय. फर्नांडिस, किशोर जाधव, अशोक कांबळे, डी. एस. जॉन, शिवनाथ बियाणी, संजय गायकवाड यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त विद्यापीठात संचलन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व शहीद स्मृती केंद्र कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर शनिवार, दि. २९ सप्टेंबर रोजी सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त एन.सी.सी.च्या कॅडेटनी संचलन केले, तर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी देशभक्तिपर पथनाट्याचे सादरीकरण केले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.



पुढारी

## संक्षिप्त



कोल्हापूर : विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त संचलन करताना एन.सी.सी.चे छात्र. (छाया : पप्पू अत्तार)

# सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त विद्यापीठात एन.सी.सी. संचलन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व शहीद स्मृती केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी देशभक्तीपर पथनाट्याचे सादरीकरण केले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

सकाळ



**कोल्हापूर : सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी संचलन केले.**

# शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांचे संचलन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व शहीद स्मृती केंद्रातर्फे मुख्य इमारतीसमोर सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी देशभक्तिपर पथनाट्याचे सादरीकरण केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
03/10/2018 Page No. 6

# जगण्याचा भाग म्हणून पर्यावरणाकडे बघा

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वसुंधरा मित्र पुरस्कार वितरण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

पर्यावरण चळवळ ही समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचली पाहिजे. तिच्याकडे जीवन जगण्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. ते पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.

शाहू स्मारक येथे आयोजित नवव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत मंगळवारी पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्था व्यक्तींना वसुंधरा गौरव, वसुंधरा मित्र पुरस्काराने गौरवण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. डी. टी. शिर्के होते. स्वागत संयोजक चंद्रहास रानडे यांनी केले. मानपत्र वाचन उदय गायकवाड यांनी केले. यावेळी छायाचित्रकार बी. डी. चेचर, मलबार नेचर क्लब, फ्रेंडस् नेचर क्लबचे तुषार साळगावकर यांना वसुंधरा मित्र, तर शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, पंचगंगा प्रदूषण सुकाणू समिती सदस्य डॉ. एस. डी. कदम, सायबरच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. ए. आर. कुलकर्णी यांना वसुंधरा गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.




**कोल्हापूर : नवव्या किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवांतर्गत मंगळवारी विविध मान्यवरांना वसुंधरा मित्र आणि वसुंधरा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. (छाया : एस. अली)**

यावेळी शिर्के म्हणाले, अन्न, वस्त्र, निवारा या प्रमुख गरजा मानताना आपण हवा आणि पाण्याला गृहीतच धरले; मात्र आता या दोन गोष्टींचीच भविष्यात प्रमुख गरज भासणार आहे. माणसाने स्वतःचे सोडून दुसऱ्याचे ओरबडायला सुरुवात केली आहे. त्यामुळेच पर्यावरण प्रश्न बिकट बनला आहे. दरम्यान, डॉ. राऊत यांनी पंचगंगा प्रदूषणमुक्तीच्या लढ्यातील विविध अनुभव शेअर केले. अनिल चौगुले यांनी आभार मानले. दुर्गा आजगावकरने सूत्रसंचालन केले.

यावेळी कृष्णा गावडे, विजय टिपुगडे, राहुल पवार, केदार मुनिश्वर, ऐश्वर्या मुनिश्वर उपस्थित होते.

### आज महोत्सवात

- **सकाळी सात : दुधाळी सांडपाणी प्रक्रिया केंद्राला भेट**
- **सकाळी दहा : इचलकरंजीतील डीकेटीई कॉलेजमध्ये 'वस्त्रोद्योग : नदी प्रदूषणाची आव्हाने' या विषयावर परिसंवाद**
- **दुपारी दोन ते चार : लघुपट व माहितीपटांचे प्रदर्शन**
- **सायंकाळी साडेसहा : किर्लोस्कर समूहातील कर्मचाऱ्यांचा कलाविष्कार**

3 OCT 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण संवर्धन जगण्याची चळवळ व्हावी

## शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे दुसरे पुष्प ; पुरस्काराचे वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

अन्न, वस्त्र, निवाऱ्याबरोबरच हवा, पाणी या मुलभूत गरजा आहेत. या मुबलक नैसर्गिक साधनसंपत्तीमुळे मानवाने हवा, पाण्याला गृहीत धरले आहे. पाण्याबाबत चंगळवाद सुरू आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीची होणारी नासाडी पाहता भविष्यात पाणी विकत घेण्याची स्थिती निर्माण होणार आहे. या धोक्यापूर्वीच पर्यावरण संवर्धन ही जगण्याची चळवळ व्हावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शाहू स्मारक भवनात किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मंगळवारी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत वसुंधरा गौरव पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. पर्यावरण जतन, संवर्धन चळवळीत कार्यरत असलेल्यांना वसुंधरामित्र, वसुंधरागौरव पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी किर्लोस्कर कंपनीचे संजीव निमकर, संचालक वीरेंद्र चित्राव, सहायक सल्लागार कृष्णा गावडे, निसर्गमित्रचे अनिल चौगुले, विजय टिपुगडे आदींची उपस्थिती होती.

शिर्के म्हणाले, मानवाला जगण्याच्या मर्यादा कमी असल्या तरी सात पिढ्या साठवण्याकडे तो वळला आहे. आपले सोडून दुसऱ्याची घ्यायची सवय लागल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे मानवनिर्मित संकटांबरोबरच त्याने निसर्गनिर्मित संकटांना आपलेसे केले आहे. हवा, पाणी, ध्वनी प्रदुषणाची संकटे आली आहेत.

डॉ. सुनील पाटील यांनी नेदरलँडमधून मिळवलेला भारतीय दुर्मिळ वनस्पतीची २५० वर्षापूर्वीच्या ताम्रपटाचा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. सकाळी धुण्याच्या चावीच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. युवा संवाद स्पर्धेमध्ये सायबर, पर्यावरणशास्त्र, शिवाजी विद्यापीठ, संजय घोडावत इन्स्टिट्यूट, न्यु आर्किटेक्चर, डी. वाय. पाटील, केआयटी महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला.




**कोल्हापूर : शाहू स्मारक भवनात मंगळवारी वसुंधरा महोत्सवात पुरस्कार विजेत्यांसमवेत उपस्थित मान्यवर.**

### रंकाळा संवर्धनासाठीचे १० कोटी गेले कुठे : प्रा. एस. डी. कदम

कोल्हापूर शहरामध्ये पंचगंगा नदी आणि रंकाळा प्रदुषण हे मोठे प्रश्न आहेत. ते सुटू शकतात, पण मानसिकता नाही. आपण २० वर्षापूर्वी रंकाळा तलावातील प्रदुषणाचा अभ्यास केला. त्यावरील प्रबंध केंद्राच्या पर्यावरण मंत्रालयाला सादर केला. त्यानंतर केंद्र सरकारने रंकाळा संवर्धनासाठी १० कोटी रुपये दिले. पण ते कुठे गेले, हे माहिती नाही. रंकाळ्यात येणारे सांडपाणी रोखल्यास अन् नागरिकांत प्रबोधन केल्यास रंकाळा प्रदुषणमुक्त राहील. हीच स्थिती पंचगंगा प्रदुषणासंदर्भात आहे. प्रश्न अवघड नाही, फक्त कृती हवीय, प्रदुषण रोखता येणे शक्य असल्याचे प्रा. एस. डी. कदम यांनी सांगितले.

### आज वसुंधरा चित्रपट महोत्सवात

सकाळी ७ वाजता– दूधळी एस.टी. पी. ला सहल
१० वाजता –डी. के. टी. ई येथे नदी प्रदुषण आणि वस्त्रोद्योग विषयावर चर्चासत्र
दुपारी मुलांसाठी चित्रपट प्रदर्शन
सायंकाळी ५ वाजता किर्लोस्कर कर्मचाऱ्यांचा वृंदा सांस्कृतिक कार्यक्रम

### मोबाईल फोन म्हणजे माणसाचे हृदय

मोठ्या रिंगटोनसह व्हायब्रेटने वाजणारा मोबाईल मानवाचे हृदय बनला आहे. वीज बचतीचा डंका मिरवणारे हातात मोबाईल घेऊन हजारो मेगावॅट वीज खर्च करत असतात. आसपास पाहिल्यास आपणाला समजेल आपण किती वीज खर्ची घालवतो, याचे भान ठेवल्यास उर्जाबचत शक्य असल्याचे प्रभारी कुलगुरू शिर्के यांनी सांगितले.

### वसुंधरा पुरस्कार

वसुंधरा गौरव पुरस्काराने प्रा. पी. डी. कदम, प्रा. एस. डी. कदम, प्रा. डॉ. अनिल कुलकर्णी यांना तर वसुंधरा मित्र पुरस्काराने छायाचित्रकार बी. डी. चेचर आणि मलबार नेचर कॉन्झर्वेशन क्लबचा तुषार साळगावकर यांना गौरवण्यात आले.

सकाळ

# पर्यावरण जगण्याची चळवळ व्हावी

## डॉ. डी. टी. शिर्के; वसुंधरा गौरव-वसुंधरा मित्र पुरस्कारांचे वितरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : 'केवळ अन्न, वस्त्र व निवाराच नव्हे; तर आता हवा आणि पाणी याही आपल्या प्रमुख गरजा बनल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पर्यावरण आता प्रत्येकाच्या जगण्याचीच चळवळ बनली पाहिजे,' असे स्पष्ट मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. येथे सुरू असलेल्या नवव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत वसुंधरा गौरव व वसुंधरा मित्र पुरस्कार वितरणावेळी ते बोलत होते. शाहू स्मारक भवनात हा कार्यक्रम झाला.

दरम्यान, यावेळी झालेल्या कार्यक्रमात 'सकाळ'चे छायाचित्रकार बी. डी. चेचर, मलबार नेचर क्लब, फ्रेंडस् नेचर क्लबचे तुषार साळगावकर यांना वसुंधरा मित्र; तर शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, पंचगंगा प्रदूषणप्रश्नी सुकाणू समिती सदस्य डॉ. एस. डी. कदम, 'सायबर'च्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. ए. आर. कुलकर्णी यांना वसुंधरा गौरव पुरस्काराने गौरवण्यात आले.



कोल्हापूर : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मंगळवारी वसुंधरा गौरव व वसुंधरा मित्र पुरस्कारांचे वितरण झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कृष्णा गावडे, चंद्रहास रानडे, अनिल चौगुले, वीरेंद्र चित्राव, विजय टिपुगडे, उदय गायकवाड यांच्यासह डॉ. एस. डी. कदम, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. आर. कुलकर्णी, बी. डी. चेचर, तुषार साळगावकर व मलबार क्लबचे पदाधिकारी.

(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

### आज महोत्सवात

- **सकाळी सात : दुधाळी सांडपाणी प्रक्रिया केंद्राला भेट**
- **सकाळी दहा : इचलकरंजीतील डीकेटीई कॉलेजमध्ये 'वस्त्रोद्योग : नदी प्रदूषणाची आव्हाने' या विषयावर परिषद**
- **दुपारी दोन ते चार : लघुपट व माहितीपटांचे प्रदर्शन**
- **सायंकाळी साडेसहा : किर्लोस्कर समूहातील कर्मचाऱ्यांचा कलाविष्कार**

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी एकूणच वर्तमान आणि पर्यावरणीय प्रश्नावर भाष्य करताना माणसाने आपले सोडून, दुसऱ्याचे ओरबडायला सुरवात केल्याने प्रश्नांचा गुंता वाढल्याचे सांगितले. डॉ. राऊत यांनी पंचगंगा प्रदूषणमुक्तीच्या लढ्यातील विविध अनुभव शेअर केले. डॉ. कदम, श्री. साळगावकर, 'मलबार'च्या वतीने सायली पलांडे-दातार यांनीही मनोगते व्यक्त केली. 'सकाळ' समूहाने काम करण्याची संधी दिल्याने आजवर अनेक छायाचित्रे, व्हिडिओ स्टोरीज्च्या माध्यमातून विविध प्रश्नांचा वेध घेतला. 'सकाळ'सह कुटुंब आणि वडणगे गावचा हा पुरस्कार असल्याचे श्री. चेचर यांनी सांगितले.

संयोजन समितीचे उपाध्यक्ष कृष्णा गावडे, विजय टिपुगडे व्यासपीठावर उपस्थित होते. संयोजन समितीचे अध्यक्ष चंद्रहास रानडे यांनी स्वागत केले. उदय गायकवाड यांनी मानपत्रांचे वाचन केले. अनिल चौगुले यांनी आभार मानले. दुर्गा आजगावकरने सूत्रसंचालन केले.

**सिंगापूरचं मॉडेल**

आपल्याला पाण्याची किंमत नाही; मात्र दुष्काळी भागातून जाऊन आले, की त्याची किंमत कळते. त्याच्याही पुढे जाऊन प्रत्येकाने एकदा सिंगापूरच्या पाण्याच्या मॉडेलचा अभ्यास करावा. कारण सिंगापूर बहुतांश टक्के पाणी आयात करते आणि त्याचेही नियोजन २०६० पर्यंत त्यांनी करून ठेवले असल्याचेही प्रा. डॉ. शिर्के म्हणाले.

### धुण्याची चावी स्वच्छता मोहीम

**महोत्सवांतर्गत आज सकाळी धुण्याची चावी परिसराची स्वच्छता झाली. दुपारी झालेल्या युवा संवाद उपक्रमात सायबर, शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभाग, संजय घोडावत युनिव्हर्सिटी, न्यू आर्किटेक्चर, डी. वाय. पाटील कॉलेज, केआयटी कॉलेजमधील विद्यार्थी सहभागी झाले.**

3 OCT 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणपूरक जीवनशैली चळवळ बनावी

## डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : वसुंधरा गौरव, वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांबरोबरच आता हवा आणि पाणी हे दोन्ही घटक तितकेच महत्त्वाचे ठरले आहेत. यापुढे या घटकांना गृहीत धरून चालणार नाही. म्हणूनच पर्यावरणपूरक जीवनशैली चळवळ बनावी, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

नवव्या 'किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवा'च्या दुसऱ्या दिवशी 'वसुंधरा गौरव' आणि 'वसुंधरा मित्र' पुरस्कार वितरणावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर किर्लोस्करचे प्लान्ट हेड चंद्रहास रानडे, महोत्सव समन्वयक विरेन चित्राव, कृष्णा गावडे, विजय टिपुगडे, अनिल चौगुले उपस्थित होते.

प्लान्ट हेड चंद्रहास रानडे यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. गेली अनेक वर्षे नोकरी, व्यवसाय सांभाळून अनेक मंडळी पर्यावरण संवर्धनासाठी जिल्ह्यात कार्यरत आहेत. त्यांना पाठबळ देण्यासाठी या महोत्सवामध्ये पुरस्कार वितरित केले जात असल्याचे ते म्हणाले.

यावेळी प्रा. पी. डी. राऊत, प्रा. एस. डी. कदम, प्रा. डॉ. अनिल कुलकर्णी यांचा 'वसुंधरा गौरव' आणि तुषार साळगावकर (राधानगरी), छायाचित्रकार बी. डी. चेचर यांचा 'वसुंधरा मित्र' पुरस्काराने शिर्के यांच्या हस्ते गौरव केला. तसेच आंबोली येथील मलबार नेचर कॉन्झरवेशन ग्रुपचाही यावेळी 'वसुंधरा मित्र' पुरस्काराने सन्मान केला. क्लबचे अध्यक्ष काका भिसे, सायली पलांडे-दातार यांच्यासह क्लबच्या कार्यकर्त्यांनी हा पुरस्कार स्वीकारला. मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. उदय गायकवाड यांनी मानपत्रांचे वाचन केले. सत्काराला उत्तर देताना प्रा. राऊत यांनी राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेतून रंकाळ्यासाठी १० कोटी रुपये आले; मात्र रंकाळा शुद्ध झाला नाही हे वास्तव मांडले.

दीपक जाधव



'किर्लोस्कर वसुंधरा' महोत्सवामध्ये मंगळवारी 'वसुंधरा गौरव' आणि 'वसुंधरा मित्र' पुरस्काराने (पाठीमागे उभे) डॉ. अनिल कुलकर्णी, प्रा. एस. डी. कदम, प्रा. पी. डी. राऊत, बी. डी. चेचर, तुषार साळगावकर, सायली पलांडे-दातार, काका भिसे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी (बसलेले) डावीकडून विजय टिपुगडे, अनिल चौगुले, डी. टी. शिर्के, चंद्रहास रानडे, विरेन चित्राव, कृष्णा गावडे आणि उदय गायकवाड उपस्थित होते.

### वारसास्थळाची स्वच्छता

या महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून धुण्याच्या चाव्या परिसराची स्वच्छता केली. ॲड. केदार मुनीश्वर, उदय गायकवाड यांनी या स्थळाची माहिती दिली. राहुल पवार, समीर व्याघ्रांबळे यावेळी उपस्थित होते. दुपारी सायबरमध्ये युवा संसद स्पर्धेत सायबर, शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभाग, संजय घोडावत विद्यापीठ, न्यू आर्किटेक्चर डी. वाय. पाटील, केआयटी या महाविद्यालयांच्या संघांनी भाग घेतला. दुपारच्या सत्रात चित्रपट प्रदर्शनादरम्यान डॉ. सुनील पाटील यांनी नेदरलँडमधून मिळवलेली भारतीय दुर्मीळ वनस्पतीवरील २५० वर्षांपूर्वीच्या ताम्रपटामधून तयार केलेला चित्रपट प्रदर्शित केला.

### आज किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवात

- सकाळी ७ वाजता दुधाळी एसटीपी प्लांटला भेट
- १० वाजता डीकेटीई इचलकरंजी येथे नदी प्रदूषण आणि वस्त्रोद्योग या विषयावर चर्चासत्र
- दुपारी चित्रपट प्रदर्शन
- सायंकाळी किर्लोस्कर कर्मचारी वृंद सांस्कृतिक कार्यक्रम

# 'पर्यावरण संवर्धन ही जगण्याची चळवळ व्हावी'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'पाणी आणि हवा या गरजांना आपण इतके गृहित धरतो की जेव्हा या स्रोतांच्या प्रदूषणाचा परिणाम मानवी जीवन उध्वस्त करण्यापर्यंत टोक गाठेल तेव्हा मानवाला त्यांची किंमत कळेल. त्यामुळे पर्यावरण संवर्धन ही जगण्यातील चळवळ बनली पाहिजे' असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

दसरा चौकातील शाहू स्मारक भवनात नवव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत मंगळवारी डॉ. शिर्के यांच्या हस्ते पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थेला वसुंधरा गौरव व मित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

अर्जुन टाकळकर




**किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातंर्गत वसुंधरा गौरव व मित्र पुरस्कारप्राप्त डॉ. पी. डी. राऊत, डॉ. एस. डी, कदम, अनिल कुलकर्णी, बी. डी. चेचर, तुषार साळगावकर टीमसमवेत डावीकडून विजय टिपुगडे, अनिल चौगुले, डॉ. डी. टी. शिर्के, चंद्रहास रानडे, वीरेंद्र चित्राव, कृष्णा गावडे आदी.**

## वसुंधरा गौरव, वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, पंचगंगा प्रदूषणप्रश्नी सुकाणू समिती सदस्य डॉ. एस. डी. कदम, 'सायबर'च्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. ए. आर. कुलकर्णी यांना वसुंधरा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. छायाचित्रकार बी. डी. चेचर, मलबार नेचर क्लब, फ्रेंड्स नेचर क्लबचे तुषार साळगावकर यांना वसुंधरा मित्र पुरस्काराने गौरवण्यात आले.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'ज्या पृथ्वीने माणसाला अमर्याद दिले, ते माणसाने ओरबडायला सुरूवात केली आहे. अन्न, वस्त्र, निवारा या गरजांसोबत शुद्ध हवा व पाणी या गरजा निर्माण झाल्या आहेत. जगण्यासाठी जेवढे लागते, त्याऐवजी साठवण्यासाठी जमवणं ही मानवी प्रवृत्ती धोकादायक ठरत आहे. पाण्याच्या वापराबाबत वाढत असलेली चंगळवादी वृत्ती चुकीची आहे. जे फक्त निसर्ग, पक्षी, प्राणी यांच्यासाठीच्या काही जागा निश्चित केल्या पाहिजेत.'

डॉ. राऊत यांनी पंचगंगा प्रदूषणमुक्तीच्या लढ्यातील विविध अनुभव कथन केले. डॉ. कदम, तुषार साळगावकर, सायली पलांडे-दातार यांनी मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर संयोजन समितीचे उपाध्यक्ष कृष्णा गावडे, विजय टिपुगडे उपस्थित होते. संयोजन समितीचे अध्यक्ष चंद्रहास रानडे यांनी स्वागत केले. उदय गायकवाड यांनी मानपत्रांचे वाचन केले. अनिल चौगुले यांनी आभार मानले. दुर्गा आजगावकर यांनी सूत्रसंचालन केले.

### आज महोत्सवात

- सकाळी सात वाजता : दुधाळी सांडपाणी प्रक्रिया केंद्राला भेट
- सकाळी १० वा. : इचलकरंजीत डीकेटीई कॉलेजमध्ये 'वस्त्रोद्योग... नदी प्रदूषणाची आव्हाने' या विषयावर परिषद
- दुपारी दोन ते चार : लघुपट व माहितीपटांचे प्रदर्शन
- सायंकाळी साडेसहा वाजता : किर्लोस्कर समूहातील कर्मचाऱ्यांचा कलाविष्कार

पुढारी




कोल्हापूर : वसुंधरा गौरव पुरस्काराने डॉ. पी. डी. राऊत यांना सन्मानित करताना प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डावीकडून उपस्थित विजय टिपुगडे, अनिल चौगुले, राहुल पोवार, कृष्णा गावडे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# पर्यावरण जगण्याचा भाग बनावा : शिर्के

कोल्हापूर : प्रतिनिधी

पर्यावरण हा लोकांच्या जगण्याचा भाग बनावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. किर्लोस्कर वसुंधरा फिल्म फेस्टिव्हलअंतर्गत वसुंधरा मित्र व वसुंधरा गौरव पुरस्कार गौरव समारंभात ते बोलत होते. शाल, श्रीफळ व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे पर्यावरण विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, डॉ. एस. डी. कदम, डॉ. अनिल कुलकर्णी यांना वसुंधरा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तुषार साळगावकर यांना वसुंधरा मित्र पुरस्काराने गौरवण्यात आले. यावेळी शिर्के यांनी पर्यावरणाबाबत जागृती ही काळाची गरज आहे. यावेळी पी. डी. राऊत, डॉ. कदम यांनी मनोगत व्यक्त केली. दरम्यान, महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी रंकाळा धुण्याची चावी येथे हेरिटेज सहल, तसेच युवा संवाद व पर्यावरणविषयक चित्रपट प्रदर्शित करण्यात आले. आज, बुधवारी सायंकाळी किर्लोस्कर कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमास कृष्णा गावडे, चंद्रहास रानडे, राहुल पवार, अनिल चौगुले, विजय टिपुगडे उपस्थित होते.